# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२
## (सकाळी ११-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (६)] —**

(१) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, नागोराव गाणार, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माटुंगा येथील मुंबई महानगर पालिकेच्या शाळेत वर्गातील विद्यार्थी डान्सच्या तासासाठी बाहेर जाताच आठवीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी तेरा वर्षीय विद्यार्थिनीवर वर्गात लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असणे, या संदर्भात मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन विद्यार्थ्यांविरोधात गुन्हा नोंदवलेला असणे, त्याचप्रमाणे कल्याण स्टेशन परिसरातील जवळच्या सोसायटीत एका नववर्षाच्या मुलीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडालेली असणे, या अल्पवयीन मुलीवर आधी बलात्कार करून नंतर तिची हत्या केल्याची प्राथमिक माहिती उघडकीस येणे, यासंदर्भात कल्याण पोलिस स्टेशन मध्ये बलात्कार प्रकरणी गुन्ह्यांची नोंद करण्यात येणे, तसेच लहान वयात हाती आलेले मोबाईल व अश्लील व्हिडीओ सहज उपलब्ध होत असल्याने शरीरासंबंधीच्या विकृत दृष्टिकोन लहान वयातच मुलांमध्ये वाढत असणे यामुळे लहान अल्पवयीन मुले हिंसेचा व सूड घेण्याच्या प्रवृत्तीमुळे गुन्ह्याच्या विळख्यात अडकत असल्याचे मत मानसोपचार तज्ञांनी व्यक्त केले असणे, त्यामुळे शाळा व शाळा परिसरात मोबाईल जामर लावण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, त्यामुळे राज्यातील शाळकरी विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झालेला असणे यासाठी शासनाने एक टास्क फोर्स नेमून शाळेतील विद्यार्थिनींना योग्य ते संरक्षण देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

अप्रकाशित प्रत

**(२)** **सर्वश्री अभिजित वंजारी,** राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यामध्ये फक्त विदर्भातील नागपूर आणि अमरावती विभागामध्ये इंग्रजांच्या काळापासून नझूल जमीनी भाडेपट्ट्यावर दिलेल्या असणे, नझूल भाडेपट्ट्याचे हस्तांतरण, व्यापारात बदल, शर्ती भंग, नियमितीकरण इत्यादीकरिता अनअर्जीत रक्कमेचे दर हे वाजवीपेक्षा जास्त असून इतकी रक्कम शासनाकडे जमा करणे, दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर झालेले असणे, नागपुरातील धंतोली, रामदासपेठ आणि ज्या ज्या भागात नझूलच्या जमीनी आहेत, त्या ठिकाणी भाडेपट्टे नूतनीकरण न केल्याने जिल्हा कार्यालयातून दिनांक ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत संबंधित रहिवाशांनी भाडेपट्टे नूतनीकरण न केल्यास त्या जप्त करण्याचे आदेश देणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, यापूर्वी सुध्दा नागपूर विभागामध्ये भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणामध्ये विलंब केल्यास आणि त्या अटी व शर्ती भंग केल्यास त्या पट्टेधारकाला दोन हजार प्रती स्क्वेअर फूट इतका दंड आकारला जात असणे आणि अशाप्रकारच्या कारवाईमुळे शासनाकडे हजारो कोटी रूपयाचा महसूल जमा होणे, परंतु राज्याच्या इतर विभागामध्ये नझूल भाडेपट्ट्यावर जमीनीच्या कायदा अस्तित्वात नसल्यामुळे तसेच स्वातंत्र्याच्या काळानंतर ब्रिटीशकालीन अनेक कायदे आपण रद्द केलेले नसणे, त्यामुळे नझूल भाडेपट्ट्यावर दिलेल्या संदर्भावर पूर्व विदर्भातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत शासनाने पुनर्विचार करुन बाधित लोकांना दिलासा देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **श्री. जयंत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र सरकार कर्मचाऱ्यांनी साई वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येणे, सदर संस्था केवळ कोकण वासियांसाठी गठीत करण्यात येवून त्यांनी दि.१८.४.२००६ च्या पत्रान्वये मा.अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचेकडे मुंबई उपनगर जिल्हा मौजे विक्रोळी, ता.कुर्ला सर्व्हे नं.६५ मधील ७ एकर जागा मिळणेबाबत मागणी करून अद्यापही साई वैभव सहकारी, गृहनिर्माण संस्थेला जागा न देण्यात येणे, सदर संस्थेचे २१२ हून अधिक सदस्य असतानाही संस्थेला जागा न मिळाल्याने घरांचा प्रश्न प्रलंबित राहणे, सदर जागा मिळणेबाबत संस्थेकडून सातत्याने पाठपुरावा करूनही प्रश्न अद्याप निकाली न निघणे, सन २०१३ साली असलेल्या तत्कालीन महसूल मंत्री यांनी याबाबत

सोसायटीचे पदाधिकारी व संबंधित अधिकारी यांची एकत्रितपणे बैठक घेऊन त्यातून योग्य तो मार्ग काढून सोसायटीच्या सभासदांना मदत करण्याकरीता प्रयत्न केला जाईल असे आश्वासन देण्यात येणे, परंतु दिलेल्या आश्वासनानुसार अद्याप या विषयासंदर्भात कोणत्याही संबंधित अधिकारी तसेच साई वैभव सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर कोणतीही बैठक न होणे, परिणामी संस्थेच्या सदस्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मेंढपाळ बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून नाहक त्रास बांधवांना सहन करावा लागत असणे, राज्यात गेली अनेक वर्ष धनगर समाज आपला पारंपारिक मेंढीपालन व्यवसाय करून आपली उपजीविका चालवत असणे, या व्यवसायामुळे मेंढपाळ बांधव महाराष्ट्रभर भटकंती करत असणे, परंतु गेल्या काही काळामध्ये मेंढपाळ आणि वन खात्याचे अधिकारी तसेच गावगुंडांमध्ये सातत्याने संघर्षाची परिस्थिती उद्भवत असणे, मेंढपाळांना जंगली चराई साठी खुली करणे, धरण बुडीत क्षेत्र खुले करणे, वृक्ष लागवडीस पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर वनीकरणाच्या जमिनीसाठी खुल्या करणे, १००-१०० वर्षापासून लाभक्षेत्र मध्ये मेंढपाळ वास्तव्यास असून त्यांना वन अधिकाऱ्यांकडून नाहक त्रास सहन करावा लागत असणे, गायरानावरती अतिक्रमण झाल्यामुळे मेंढ्यांच्या साठी जमिनी शिल्लक राहिल्या नसणे, तरी ती अतिक्रमण काढणे, तसेच पावसाळ्यात दूषित पाणी पिल्याने व रस्ते अपघातात शेळ्या मेंढ्या मरण पावतात अशावेळी नैसर्गिक आपत्ती घोषित करून मेंढपाळांना आर्थिक भरपाई देण्यात यावी, अशा अनेक मागणी राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या शासनाकडे असणे, दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी शासनाने मा. वने मंत्री यांनी राज्यातील मेंढपाळ बांधव व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन याबाबत येणाऱ्या २० दिवसात माहिती सादर करून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असणे, संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश देऊन एक महिना पेक्षा अधिकचा कालावधी होऊन देखील आजमितीस मेंढपाळ बांधवांच्या प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामुळे राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या मनात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

**(५)** **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, शशिकांत शिंदे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **फलोत्पादन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यावर्षी विदर्भात १ लाख ७० हजार हेक्टरवर संत्री-मोसंबीची लागवड करण्यात आलेली असणे, परंतु यंदा राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भातील संत्री पिकावर त्याचा विपरीत परिणाम झाल्याचे आढळून येणे, या दरम्यान संत्री कोळशी या रोगामुळे काळी पडू लागल्याचे व त्यामुळे संत्री उत्पादनात घट झाल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कोळशी रोगाचा प्रादुर्भाव झाला असतांना शासकीय यंत्रणांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे तसेच संत्रा उत्पादकांना कसलेही मार्गदर्शन करण्यात आले नसल्याबाबत उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे तक्रारी केल्या असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, काळी पडलेली किंवा डाग असलेली संत्री व्यापारी सुध्दा खरेदी करीत नसल्यामुळे उत्पादकांना मोठया प्रमाणात आर्थिक फटका बसल्याचे निदर्शनास येणे, यास्तव संत्री उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात येणे, परंतु त्याकडे शासकीय यंत्रणांनी दुर्लक्ष करण्यात येणे, परिणामी, विदर्भातील संत्रा उत्पादकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व उदासिनतेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन नुकसान भरपाई देण्याप्रकरणी कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबतची शासनाची प्रतिक्रिया."

**(६)** **श्री. अंबादास दानवे,** डॉ. मनिषा कायंदे, ॲड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दिवाळी सणानिमित्त शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने महाराष्ट्र दिवाळीनिमित्त फूड किट (चना डाळ, रवा, साखर व पामतेल) पुरवठा करण्याबाबत राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीपूर्वीच ५१३ कोटी २४ लाख रुपयांची निविदा NCDEX Emarkets limited या कंपनीला देण्यात आलेली असणे, दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी कंपनीकडून परिपत्रक प्रसिध्द झाले असून शासनाच्या निकषाप्रमाणे निविदाप्रक्रिया न करता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मनमानी पध्दतीने संबंधित कंपनीला कंत्राट देण्यात आलेले असणे, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता काढण्यात आलेले टेंडर, नेमलेले ठेकेदार ही सर्व कारवाई करत असताना, शासन नियमाप्रमाणे कोणतेही नियम व निकष यांचे पालन करण्यात न आल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, पुणे, मुंबई, औरंगाबाद तसेच राज्यातील अन्य जिल्हयात दिवाळी सणाच्या आधी रेशनकार्ड धारकांना आनंदाचा शिधा मिळाला नसल्याच्या आलेल्या लाखो तक्रारी, जाहिर केलेले पाच जिन्नस एकाच पिशवीतून एकाच वेळी

मिळाल्याच्या घटना संपूर्ण राज्यात कोठेही न घडणे, शासनाने शिधापत्रिका धारकांना हा आनंदाचा शिधा देत असताना औरंगाबाद, नाशिक, नगर इ.अनेक जिल्हयात बायोमेट्रिक यंत्रणा बंद असल्याने सदर शिधा रेशनधारकांपर्यंत पोहोचविण्यात रेशन दुकानदारांना आलेले अपयश, राज्यातील लाभार्थ्यांना दिवाळी सणानिमित्त स्वस्तात अन्न धान्य मिळावे यासाठी १०० रुपये अशी आनंदाचा शिधाची किंमत शासनाने निश्चित करण्यात आलेली असताना ही आदिवासी भागातील शहापूर तालुक्यात ३०० रुपयात विक्री होत असल्याची घटना निदर्शनास येणे, राज्यात पैठण व इतर भागात शिधावाटपाच्या पिशवीवर राजकीय नेत्यांचे फोटो छापण्यास उशीर झाल्यामुळे दिवाळी सणाच्या दिवशीही आनंदाचा शिधा त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नसल्याच्या घटना निदर्शनास येणे, सामान्य जनतेची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने निविदा काढण्यात दाखवलेली तत्परता, सर्वसामान्य लाभार्थ्यांना आनंदशिधा मिळण्यासाठी न दाखविल्यामुळे जनतेमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, दिवाळी सणानिमित्त किती आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला तसेच सदर विक्रीतून झालेल्या उत्पन्नाच्या लेखाशिर्षाची माहिती लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागास मागूनही देण्यात आलेली नसणे, सदर प्रकरणाची चौकशी करुन नियमांची पायमल्ली करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच सर्व सामान्य नागरिकांची लूट करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रमाणित प्रत

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी व तेरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री : (क)** "सन २०१४-२०१५ या वर्षाचा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन (चतुर्थ) अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा चौसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१३-२०१४ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे चौदावा, पंधरावा, सोळावा, सतरावा, अठरावा, एकोणीसावा, वीसावा व एकवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री** : "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** **पशुसंवर्धन मंत्री** : "महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **संसदीय कार्य मंत्री** : विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मा. मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकुण ६६ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ९४ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह, विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(५) **वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(६) **खनिकर्म मंत्री** : "मॉयल लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा साठावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(७) कृषी मंत्री** : "डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(८) सहकार मंत्री** : "महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(९) पर्यटन मंत्री** : "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६ सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे एकोणचाळीसावा, चाळीसावा, एक्केचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ] —**

(१) **श्री. आमश्या पाडवी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अनुसूचित जमातीच्या राज्य शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल केलेले नाही तसेच ज्यांचे जातीचे दाखले अवैध ठरलेले आहेत अशा सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी सन २०१६, २०१७ मध्ये सेवेतून कमी करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाला दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी आदेशित करणे, सदर आदेशात उपरोक्त कर्मचाऱ्यांवर दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत कारवाई करण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले असणे, तथापि मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीच कार्यवाही न करता अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यांची बिंदू नामावलीत मंजूर कार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात येणे, तद्नंतर दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या मंत्रीमंडळ निर्णयान्वये उपरोक्त बोगस प्रमाणपत्रधारक अधिकारी व सद्यःपरिस्थितीत अधिसंख्य पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानवतेचा दृष्टीकोन लक्षात घेत सेवा विषयक लाभ देण्याचा

अप्रकाशित

निर्णय घेण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने मा.न्यायालयाच्या आदेशाची केलेली पायमल्ली, परिणामी मूळ आदिवासी समाजातील होतकरु उमेदवारांवर झालेला अन्याय, तसेच मूळ आदिवासी असलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे त्यांच्यात वाढते नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ चौकशी करुन जात वैद्यता पडताळणी प्रमाणपत्र दाखल न करणाऱ्यां व बोगस प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यकारी पदावरील नियुक्ती रद्द करुन सेवेतून कमी करण्याची आवश्यकता, तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने केलेली निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र शासनाच्या सर्व शासकीय विभागातील सरळ सेवेची भरती प्रक्रिया सन २०१९ पासून आज अखेरपर्यंत घेण्यात आलेली नसणे, तथापि, त्यासंदर्भात सरळसेवा पदभरतीबाबतची एकही जाहिरात देण्यांत आलेली नसणे, शासनाने सदर परिक्षेकरिता दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सरळसेवा पदभरतीची जाहिरात आलेली नसल्याकारणाने उमेदवार विद्यार्थी परिक्षेस बसण्यास अपात्र होत असल्याचे निदर्शनास येणे, वास्तविकत: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१९ पासून गेल्या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या परिक्षांबाबत ज्या ३-४ जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या त्यामध्ये ३०ते ४० जागा दिव्यांगाच्या सर्व संवर्गामध्ये भरण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आलेले असणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण उमेदवारांसाठी दिनांक १७/१२/२०२१ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वय संपलेले उमेदवार यांना दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत संधी देण्यात यावी, असे परिपत्रक काढण्यांत आलेले असणे, परंतु शासनाने दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वेगळा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, शासनाने दिनांक १७/१२/२०२१ च्या परिपत्रकामध्ये शुध्दीपत्रक काढून दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विहित वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत अर्ज करण्याची अनुमती देण्यात यावी म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरतीमध्ये त्यांना संधी मिळेल व त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशी सर्वसाधारण उमेदवारांनी शासनाकडे मागणी करण्यांत येणे, तथापि, अद्यापही शासन स्तरावर कार्यवाही न होणे, त्यामुळे त्याबाबत आंदोलन करण्याची या उमेदवारांवर आलेली पाळी, सदर मागणी प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन सर्वसाधारण (खुल्या) वर्गातील उमेदवारांना न्याय देणे आवश्यक असणे व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(३) **डॉ. मनिषा कायंदे,** सर्वश्री प्रसाद लाड, आमश्या पाडवी, नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात समाजकल्याण विभागामार्फत ४४१ शासकिय वसतिगृहे असून त्यात जवळपास ५० हजारांहून अधिक गरीब व गरजू विदयार्थी शिक्षण घेत असणे, परंतु या वसतिगृहात विदयार्थ्यांना गैरसोयी, अस्वच्छता आणि असुविधेचा अनुभव येणे, तर काही ठिकाणी नोंदवहीत नोंद असून विदयार्थी गायब असणे, काही वसतिगृहात तर पिण्याचे पाणी तसेच ग्रंथालयाची सोय, मुलींच्या वसतिगृहात सीसीटीव्ही नसल्याचे समोर येणे, वसतिगृहात साधनसामुग्रीचा नियमित पुरवठा होऊनही काही ठिकाणी इन्व्हर्टर, गरम पाण्याची तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, अश्या आणि अनेक सोयीसुविधांपासून विद्यार्थी वंचित असणे, सन २०२१ मध्ये ६४ कोटी रुपयांचा निधी राज्यातील सर्व शासकिय वसतिगृहाच्या सोयीसुविधांसाठी निधी देण्यात आला होता तर काही वसतिगृहाच्या दुरुस्तीकरिता साडेसात कोटीचा निधी देण्यात आलेला होता असे असतांनाही विदयार्थ्यांना सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नसणे, संगणक कक्ष, भोजन कक्ष नसणे, इमारतीतील दारे, खिडक्याच्या काचा, स्नानगृह, स्वच्छतागृह यांची असलेली दुरवस्था, उक्त विभागातर्फे सुरु असलेल्या वसतिगृहात विदयार्थ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे त्याचबरोबर गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेला निर्वाह भत्ता ,शाळा महाविदयालये सुरु होऊनही साहित्य मिळालेले नसणे, परिणामी विदयार्थी आर्थिक संकटात सापडणे ,निर्वाह भत्ता आणि इतर सुविधा तात्काळ न दिल्यास विदयार्थ्यांनी आंदोलनाचा दिलेला इशारा, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही, यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **डॉ. वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना ज्यात प्रामुख्याने मुस्लिम, बौद्ध, जैन, पारसी, शिख विद्यार्थ्यांचा समावेश असणे, अशांना प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेतून केंद्र सरकारमार्फत दरवर्षी एक हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात असणे, यावर्षी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरून घेणे व पडताळणी करून केंद्राकडे

अतारांकित प्रश्न

पाठविण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (योजना) कार्यालयाकडे दिली जाणे, सुरुवातीला अत्यल्प अर्ज भरले गेल्याने संचालनालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून देणे, त्यानंतर पुन्हा ५ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात येणे, मात्र आता विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळा स्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अचानक अर्ज रद्द करण्याचे परिपत्रक जारी करणे, या परिपत्रकानुसार पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना आर.टी.ई. नुसार मोफत शिक्षणाचा लाभ दिला जात असल्याने त्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नसणे, केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचेच अर्ज प्रमाणित करणे, त्यामुळे राज्यातील पहिली ते आठवीचे अल्पसंख्याक समाजातील राज्यातील सुमारे १० लाख विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकणे, परिणामी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व पालक वर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, अल्पसंख्यांक समाजाकडून केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यभर निदर्शने करण्यात येते, सदर शिष्यवृत्ती योजना पूर्ववत करण्याची सातत्याने मागणी अल्पसंख्यांक समाजाकडून होत असणे,केंद्र सरकारचा हा निर्णय अन्यायकारक असल्याने पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पूर्ववत सुरु ठेवावी व तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती रक्कमही वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य सरकारने मागणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : उप मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २३० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी"

**सात : सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा – (पहिला दिवस).**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** उप मुख्यमंत्री.

**२)** महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री.

अग्रिम प्रत

**३)** वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री.

**४)** आदिवासी  विकास मंत्री.

**५)** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री.

**६)** कामगार मंत्री.

**७)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

**८)** कृषी मंत्री.

**९)** शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री.

**आठ : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

(१) "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ५ – पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२"

(२) "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ६ – युनिव्हर्सल ए आय विद्यापीठ, कर्जत विधेयक, २०२२"

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ४ – जेएसपीएम विद्यापीठ, पुणे  विधेयक, २०२२"

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ – मुंबई महानगरपालिका  (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२.

**(२)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२.

---------------------------------------------------------------------------------

असुधारित प्रत

नऊ : **(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, प्रा. राम शिंदे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री रामराव पाटील, अमरीश पटेल, श्रीकांत भारतीय, प्रविण पोटे-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दटके, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्री. राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारीत सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषत: अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्ह्या-जिल्ह्यात सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरीता विशेष निधी उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्य विकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी

अग्रिम प्रत

उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरीता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्षलागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) डॉ. मनिषा कायंदे,** सर्वश्री सचिन अहिर, विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील हजारो अंगणवाडी कर्मचारी गत काही महिन्यांपासून आपल्या विविध मागण्यांसाठी सातत्याने आंदोलन करीत असणे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ, मासिक पेन्शन, नवीन मोबाईल, दैनंदिन माहिती भरण्यासाठी मराठीमधील अद्ययावत ॲप, लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार, अंगणवाड्यांच्या भाड्यात वाढ, किरकोळ खर्चासाठीच्या रकमेत वाढ, रिक्त जागांवर भरती, पदोन्नती इत्यादी मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने अंगणवाडी कर्मचारी शासनाकडे पाठपुरावा करीत असणे, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, अंगणवाड्या भाडयाच्या जागेत भरत असणे, अंगणवाड्यांना विहित वेळेत भाडे मिळत नसल्यामुळे मुळ मालक अंगणवाडी कर्मचा-यांना त्रास देत असणे, सदर कर्मचाऱ्यांना स्वतःच्या पैशातून भाडे दयावे लागत असणे, पोषण आहाराकरिता निधी तुटपुंजा असणे, यास्तव संस्था व बचत गटांमध्ये समस्या निर्माण होणे त्यामुळे सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अप्रमाणित प्रत

(२) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"विदर्भातील नागपूर, अमरावती या महसूली विभागात तत्कालीन मध्य प्रांत व बेरार भागात लागू असलेल्या कायद्यान्वये मोठया प्रमाणात नझूल व शासकीय जमिनी भाडेपट्टयावर देण्यात आल्या असून त्या हस्तांतरित वा विकता येत नसणे, दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिमूल्य आकारुन भोगवटादार वर्ग (फ्रि होल्ड) करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले असणे, सदर प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
नागपूर
दिनांक : २० डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अस्थायी प्रत